# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः12.08.2024** **वारःसोमवार**

---

1. देशातील शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ग्वाही; 109 नव्या जैवसम्पृक्त पीक वाणांचं लोकार्पण
2. हिंडेनबर्ग रिसर्चनं केलेल्या आरोपांचं SEBI कडून खंडन, अदानी समूहानंही आरोप फेटाळले,
3. भारत आणि मालदीवमधील सहकार्य पारंपरिक भूमिकेच्या पलीकडचं असल्याचं परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांचं प्रतिपादन,
4. पुढील महिन्यात हरियाणा इथं महिलांसाठी पहिली जागतिक कबड्डी स्पर्धा होणार आणि
5. मुसळधार पावसामुळे राजस्थानात 20 तर हिमाचल प्रदेशात 12 जणांचा मृत्यू.

**पंतप्रधान-वाण**

देशातील शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथल्या भारतीय कृषी अनुसंधान संस्थेमध्ये 109 उच्च-उत्पादन देणाऱ्या, हवामानाशी जुळवून घेणाऱ्या आणि नैसर्गिकदृष्ट्या पोषकद्रव्य पुरवठा करणाऱ्या जैवसम्पृक्त पीक वाणांचं लोकार्पण मोदी यांच्या हस्ते काल करण्यात आलं. हवामानाला अनुकूल आणि जास्त उत्पादन देणाऱ्या पिकांच्या वाणांमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल, असं त्यांनी सांगितलं. 109 वाणांमध्ये पिकांच्या 61 जाती असून; यात शेतातील 34 पिकं आणि 27 बागायती पिकांचा समावेश आहे. शेतातील पिकांमध्ये विविध तृणधान्यांची बियाणं आहेत. बागायती पिकांमध्ये विविध प्रकारची फळं, भाजीपाला, लागवडीची पिकं, कंद, मसाले, फुलं आणि औषधी वनस्पतींचा समावेश आहे. यावेळी पंतप्रधानांनी शेतकरी आणि शास्त्रज्ञांशी संवाद साधला. या नव्या वाणांमुळे खर्च कमी होऊन पर्यावरणावरही सकारात्मक परिणाम होईल, त्यामुळे ही पिकं अत्यंत फायदेशीर ठरतील, असं शेतकऱ्यांनी सांगितलं. हे नवे पीक वाण विकसित केल्याबद्दल मोदींनी शास्त्रज्ञांचं कौतुक केलं.

**सेबी**

सेबी म्हणजे भारतीय रोखे आणि विनिमय मंडळानं हिंडेनबर्ग रिसर्चनं केलेल्या आरोपांचं खंडन केलं आहे. या संदर्भात प्रसिद्ध केलेल्या निवेदनात हितसंबंध संघर्षाशी संबंधित समस्यांचं निराकरण करण्यासाठी आपल्याकडे पुरेशी अंतर्गत यंत्रणा असून त्यामध्ये प्रकटीकरण आणि समायोजनासाठी तरतूद समाविष्ट आहे असं सेबीने म्हटलं आहे. धारण केलेले वैयक्तिक समभाग आणि त्यांच्या हस्तांतरणाबाबत आवश्यक असलेले संबंधित खुलासे अध्यक्षांनी वेळोवेळी केले आहेत, असं निवेदनात नमूद करण्यात आलं आहे. गुंतवणूकदारांनी कोणतीही प्रतिक्रिया देण्यापूर्वी शांत राहून विचार करण्याचं आवाहन सेबीनं गुंतवणूकदारांना केलं आहे. हिंडेनबर्ग रिसर्च अहवालात समाविष्ट असलेल्या रोख्यांचं मूल्य कमी असू शकतं हे अहवालातील अस्वीकरणही गुंतवणूकदारांनी लक्षात घ्यावं, असं सेबीनं म्हटलं आहे. हिंडेनबर्ग रिसर्चने अदानी समूहाविरुद्ध केलेल्या आरोपांची सेबीने रीतसर चौकशी केली असून या समस्यांना योग्य प्रतिसाद मिळण्याची हमी असल्याचंही SEBI नं निवेदनात म्हटलं आहे. भारताच्या भांडवली बाजारांची अखंडता आणि तिची सुव्यवस्थित वाढ आणि विकास सुनिश्चित करण्यासाठी सेबी वचनबद्ध असल्याची ग्वाही सेबीने दिली आहे.

**<u>अदानी प्रतिक्रिया</u>**

दरम्यान, अदानी समूहानंही हिंडेनबर्गनं केलेले सर्व आरोप फेटाळले आहेत. आपल्या समूहावर या अमेरिकन कंपनीने केलेले हे सर्व आरोप काल्पनिक आणि दुर्भावनापूर्ण आहेत, तसच त्यांच्या वैयक्तिक फायद्याच्या दृष्टीने केले आहेत, अशी प्रतिक्रिया अदानी समूहाने दिली आहे. या आरोपांबाबत या आधीच चौकशी झाली असून सर्वोच्च न्यायालयाने ते फेटाळले आहेत, असंही अदानी समूहाने म्हटलं आहे. सेबीच्या अध्यक्ष माधवी पुरी बुच आणि त्यांचे पती धवल बुच यांच्याविरोधातील हिंडेनबर्ग अहवालाचा भारतीय म्युच्युअल फंड्स संघटनेनं निषेध केला आहे. भारताच्या गतिमान अर्थव्यवस्थेत खोडा घालण्याच्या उद्देशानं हिंडेनबर्ग संस्था अनावश्यक अविश्वासाचं वातावरण तयार करत असल्याचं संघटनेनं म्हटलं आहे. हिंडेनबर्गचा दावा पाहता भारतीय नियामक यंत्रणेबाबत त्यांचं अज्ञानच दिसून येतं, वस्तुतः सेबीनं स्थानिक आणि जागतिक गुंतवणूकदारांसाठी विश्वासार्ह बाजारपेठ निर्माण केली असल्याचं संघटेननं आग्रहानं नमूद केलं आहे.

**<u>भाजपा-टिका</u>**

हिंडेनबर्ग अहवालाच्या संदर्भात भाजपने विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. गेल्या काही वर्षांपासून संसदेचं अधिवेशन सुरू होण्याच्या सुमारास हा परदेशी अहवाल प्रसिद्ध होतो असं भाजपचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी काल प्रसारमाध्यमांना सांगितलं. अहवालाच्या वेळेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत हे प्रकरण सरकारी कंपनीशी संबंधित आहे की खाजगी कंपनीशी असा संभ्रम निर्माण करून विरोधकांनी देशात आर्थिक अराजकता निर्माण केल्याचा आरोप त्रिवेदी यांनी केला.

**<u>नीट-पीजी</u>**

NEET PG 2024 ची परीक्षा काल रविवारी देशभरातल्या 170 शहरांमध्ये यशस्वीरित्या पार पडली. यावर्षी 2 लाख 28 हजार 540 उमेदवारांना प्रवेशपत्रे जारी करण्यात आली असल्याची माहिती राष्ट्रीय आयुर्विज्ञान परीक्षा मंडळाने दिली आहे. NEET PG परीक्षा सुविहित होण्यासाठी 1 हजार 950 हून अधिक स्वतंत्र मूल्यांकनकर्ते आणि 300 भरारी पाठक सदस्य परीक्षा केंद्रांवर नियुक्त करण्यात आले होते. देशव्यापी परीक्षेच्या संचालनावर देखरेख ठेवण्यासाठी 8 प्रादेशिक नियंत्रण कक्ष देखील स्थापन करण्यात आले होते.

**<u>मालदीव्ज-जयशंकर</u>**

मालदीव हा हिंदी महासागर क्षेत्रातील प्रमुख भागीदार असल्यामुळे भारत आणि मालदीवमधील सहकार्य हे पारंपरिक भूमिकेच्या पलीकडे गेलं असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. मालदीवमधील अड्डू रिक्लेमेशन प्रकल्प आणि अड्डू किनारा संरक्षण प्रकल्पाचं उद्घाटन काल जयशंकर यांच्या हस्ते झालं. मालदीवमधील लोकांच्या जीवनातील सर्व पैलूंना स्पर्श करून त्यांना मूर्त फायदे मिळवून देणं हे आमच्या विकास सहकार्याचं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. Addu एक प्रादेशिक केंद्र म्हणून विकसित करण्याकरता भारतानं अड्डू रिक्लेमेशन प्रकल्प आणि किनारा संरक्षण प्रकल्पासाठी मालदीव सरकारशी भागीदारी केली आहे. पर्यटन विकास आणि अडडूचा सर्वांगीण आर्थिक विकास हे या 80 दशलक्ष अमेरिकन डॉलर्सच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचं उद्दीष्ट आहे.

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू - फिजी, न्यूझीलंड आणि पूर्व तिमोर या तीन देशांचा दौरा आटोपून काल संध्याकाळी नवी दिल्लीत परतल्या. या भेटीदरम्यान द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासोबतच महत्त्वाच्या पैलूंवरील सामंजस्य करार आणि द्विपक्षीय करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. विशेष सहभाग आणि भारतीय समुदायाची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधणं हे या भेटीचं प्रमुख उद्दीष्ट होतं.

**ऑलिम्पिक**

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचा भव्य सांगता सोहळा काल संपन्न झाला. भारताकडून हॉकी संघाचा गोलरक्षक पी. आर. श्रीजेश आणि नेमबाज मनू भाकर हे सोहळ्यातील प्रमुख ध्वजधारी होते. या स्पर्धेत भारताला 1 रौप्य आणि 5 कास्य पदकं मिळाली असून पदक तालिकेत भारत 71व्या स्थानावर राहिला. 2020 च्या टोकियो ऑलिंपिक स्पर्धेच्या तुलनेत पदक तालिकेतलं भारताचं स्थान खालावलं आहे. 2020 च्या टोकियो ऑलिंपिकमध्ये भारत 1 सुवर्ण, 2 रौप्य आणि 4 कास्य अशी 7 पदकं मिळवून 48 व्या स्थानावर होता. दरम्यान, पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत, पदक तालिकेत 40 सुवर्ण पदकांसह एकंदर 126 पदकं मिळवून अमेरिका पहिल्या स्थानावर राहिला, चीन 40 सुवर्ण पदकांसह दुसऱ्या; तर जपान 20 सुवर्ण पदकांसह तिसऱ्या स्थानावर राहिला.

**कबड्डी लीग**

पुढील महिन्यात हरियाणा इथ महिलांसाठी पहिली जागतिक कबड्डी स्पर्धा होणार असून, त्याला वैश्विक प्रवासी महिला कबड्डी लीग अस नाव देण्यात आल आहे. त्यामध्ये 15 देशातील महिला संघ सहभागी होणार आहेत. जागतिक स्तरावर कबड्डी खेळाला महत्व प्राप्त व्हावं, या खेळाचा ऑलिंपिक स्पर्धेमध्ये समावेश व्हावा आणि 2036 मध्ये भारतामध्ये ऑलिंपिक स्पर्धांचं आयोजन करण्याच्या दृष्टीने भारताच्या दावेदारीला बळ प्राप्त व्हाव, या उद्देशाने भारतात हरियाणामध्ये या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे, या स्पर्धांमध्ये इंग्लंड, पोलँड, अरजेंटिना, इटली आदी देशांच्या संघांनी या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी उत्सुकता दाखवली आहे.

**राजस्थान पाऊस**

राजस्थानच्या अनेक भागात शनिवारपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे आतापर्यंत 20 जणांचा मृत्यू झाला आहे. येत्या 24 तासात राजस्थानच्या अनेक जिल्ह्यात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला असून; त्या पार्श्वभूमीवर जयपूर शहर आणि ग्रामीण भाग, सवाई माधोपुर, दाऊसा, करौली, गंगापुर आणि भारतपूर या जिल्ह्यात; प्रशासनाने सर्व खाजगी आणि सरकारी शाळांना आज सुट्टी जाहीर केली आहे.

**हिमाचल पाऊस**

हिमाचल प्रदेशातही पावसाचा जोर सर्वदूर कायम असून, ठिकठिकाणी आलेल्या पुरामुळे आतापर्यन्त 12 जणांचा मृत्यू झाला तर तिघे जण बेपत्ता झाले आहेत. पूरग्रस्त भागात मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. किन्नौर या आदिवासी बहुल जिल्ह्यात अचानक झालेल्या पावसाने अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या घटना घडल्या असून, पूह ते रोरीक दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्गाचं नुकसान झालं आहे. सिमला जिल्ह्यातल्या चोपाल भागात तारापूर गावात पावसामुळे सफरचंद आणि ऑरकीड फुलांची साठवणूक केलेल्या पेटयांचं मोठं नुकसान झालं आहे. तसंच सीमूर जिल्ह्यात यमुना आणि मारकंद या नद्यांना पूर आला असून, येत्या 24 तासात हिमाचल प्रदेशच्या 10 जिल्ह्यांमध्ये जोरदार ते अतिजोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.